लघुलेखक (उच्चश्रेणी) गट-क या पदावरुन स्वीय सहायक, गट-ब या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन आदेश क्र. पसंप्र-२०१८/प्र.क्र.३२७ /पदुम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८.०८.२०१९

शासन आदेश:-

पशुसंवर्धन विभागातील लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट-क) (एस.१५: रु. ४१८००-१३२३००) या संवर्गात कार्यरत असलेल्या खालील विवरणपत्रात नमूद कर्मचाऱ्यांना स्वीय सहायक, सामान्य राज्य सेवा (गट-ब) (एस.१६: रु. ४४९००-१४२४००) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत असून प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना स्तंभ क्र.५ येथे नमूद ठिकाणी करण्यात येत आहे :-

अ.क्र.	कर्मचारी नांव	मंजूर महसूली संवर्ग	निवड केलेला प्रवर्ग	पदोन्नतीनंतर पदस्थापना
१.	२.	३	४	५
१.	श्रीमती कनिचे अनिता राजेंद्र, लघुलेखक (उच्चश्रेणी), सहआयुक्त पशुसंवर्धन, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे	पुणे	खुला	स्वीय सहायक, गट-ब, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२.	श्रीमती पंचभाई मिना नितीन, लघुलेखक (उच्चश्रेणी), प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, पुणे विभाग, पुणे	अमरावती	खुला	स्वीय सहायक, गट-ब, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि.४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८/१२/२०१७ रोजी खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवा जेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५/५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६-ब ने दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

२. सा.प्र.वि./कार्यासन १६-ब यांनी उपरोक्त दि. २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार सदर पदोन्नत्या तदर्थ व पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निवळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा ज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञेय याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत सा.प्र.वि./१६ब यांनी दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनानुसार देण्यात येत आहेत.

३. स्वीय सहायक (गट-ब) या पदावर पदोन्नती नंतर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी संबधित नियंत्रण अधिकारी यांनी उपरोक्त अधिका-यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी. तसेच संबधित अधिका-यांनी पदोन्नती नंतर पदस्थापनेच्या पदावर रुजू झाल्याचा अहवाल d.shedmekhe@nic.in या ईमेल संकेतस्थळावर सादर करावा.

४. संबंधित अधिकाऱ्याने पदोन्नतीच्या पदावर हजर न होता लोकप्रतिनिधी मार्फत पदस्थापनेत बदल करण्याबाबत शासनावर दबाव आणल्यास ते म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८२८१८३०५१२३०१ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilipkumar Shedmekhe

Digitally signed by Dilipkumar Shedmekhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5c22eb48b36977859e2ada92f034598cc0bc8511f0527da968636a6b9d9e10f0, cn=Dilipkumar Shedmekhe
Date: 2019.08.28 18:37:51 +05'30'

(दि.ज. शेडमेखे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध,पुणे-०७.
२. सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, अमरावती/पुणे
४. सहआयुक्त पशुसंवर्धन, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे
५. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अकोला
८. संबंधित अधिकारी, द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
९. निवडनस्ती-१.